
राजहंस एकला.....
कविता मोकाशी

राजहंस एकला....
प्रथम आवृत्ती : चैत्र शुद्ध प्रतिपदा (गुढीपाडवा)
२३ मार्च २०१२

लेखिका : कविता मोकाशी (मिरज)
kavitamokashi.kavita@gmail.com

मांडणी व सजावट : रंजन कंधारकर, संहिता हिस्वनकर (औरंगाबाद)

प्रकाशन: ई-साहित्य प्रतिष्ठान
११०२ ईटर्निटी, ठाणे
९८६९६७४६२०

©२०१२: ई-साहित्य प्रतिष्ठान.

© लेखनाचे सर्व हक्क कविता मोकाशी यांच्या कडे सुरक्षित. ई-पुस्तकात वापरलेली सर्व छायाचित्रे गुगल वरून घेतलेली आहेत.

अधिक माहितीसाठी:
http://www.esahity.com/

ई साहित्य प्रतिष्ठान ®

लेखिकेचं मनोगत.. °दोन शब्द°

कविता आणि वेदना या दोन्हीची मूळ किती खोलवर रुजली आहेत याचा अंदाज करण कठीण असतं . त्या मुळे ' राजहंस एकला ' सुचण्याचा नेमका क्षण शब्दात पकडता येणं कठीण आहे . तरी सुद्धा अस वाटत की हे देण कदाचित मनीषा [ माऊ ] कडून मिळालेलं आहे . मी आणि ती दीडएक वर्षा पूर्वी चिऊ आणि माऊच्या मैत्रीच्या कविता लिहीत असू .एकमेकींना पाहिलेलंही नसताना ! त्यात चिऊ म्हणजे चिमणी मी तर माऊ म्हणजे मांजर मनीषा ! ह्याच संकल्पनेतून राजहंस जन्माला असावा ; असं माझं मन सांगतं .
पुढे बालगंधर्व सिनेमा पहिला आणि त्यातल्या राजहंस आडनावावरून राजहंस पक्षी आठवला आणि त्याची भुरळ पडली . त्याचा नीर क्षीर विवेक , त्याला लागणारे मोत्या पोवळ्याचे खाद्य या विचारगर्दीत कुठेतरी मनात राजहंसानं घर केलं आणि त्याचा काव्यप्रवास सुरु झाला . माझ्या कल्पनेतला हा राजहंस असामान्य असूनही सामान्यांसारखा जगणारा आणि मानवी भावनांशी संवाद साधणारा संवेदनाक्षम आहे . तुम्हालाही असचं वाटलं तर ते राजहंसानं मला दिलेलं समाधानाचं देणं असेल .
मला लिहिण्या साठी सतत प्रोत्साहन देणाऱ्या माझ्या फेसबुक वरील मित्र मैत्रिणी , गुरुजन ,आणि माझा फेसबुक बाहेरील मित्रपरिवार ह्यांच्या शिवाय हे मनोगत पूर्ण होऊ शकत नाही .
बुद्धीदेवता श्री गजानन आणि जगतजननी आई तुळजाभवानी यांना वंदन करुन मी हा 'राजहंस ' आपल्या समोर ठेवते आहे !!

कविता मोकाशी .

माझ्या जन्मापुर्वीच
तुमचं जाणं ठरलं होतं
तरीही मला माहित आहे
तुमच्या आभाळाच्या अंतःकरणातून
तुम्ही माझे बोबडे बोल ऐकत आहात
माझं दुड्दुड धावणं पहात आहात
तुम्ही इथेच आहात
माझ्या पुढ्यात आणि माझ्या पाठीशी
माझ्या चिमुकल्या हातानं तुम्हाला
गोड गोड दूधभाताचा घास
आजोबा
माझं °राजहंस एकला°
तुमच्या चरणी भावपुर्वक अर्पण !

-कविता

ई साहित्य प्रतिष्ठान®

# एक



आभाळ.. ज्याचं त्याचं

उन्मत गरुडाच्या छातीवर असणारं सामर्थ्यवान आभाळ!
चिमणीच्या इवल्या नेत्रात
दिपणारं तिचं चोचीतल्या दाण्याचं आभाळ !
विजेच्या घुमटावरही
शीळ घालणारं पारव्याचं एकाकी आभाळ !
पंचमातल्या तोडीचं उच्च
स्वरात गाणारं
इंद्रधनुचं सात सुरांचं कोकीळेचं आभाळ !
अन मखमली पिसारयात
सारी सृष्टी फुलवुन धरणारं
मोराचं मोरपंखातलं निळं आभाळ !
या सारयाच आभाळाखाली
अस्तित्वहीन पाण्यातलं सरोवराचं माझं आभाळ !
त्याला कधी मला कवेत घेणं आजपर्यंत जमलं नाही
ते मात्र वाऱ्याची लहर आली की तरंगावर विहरत राहतं
बस्स तोच एक त्याच्या निळाईचा मला स्पर्श

इथं फडफड होती ती फक्त
पानांची फुलांची पाण्याची
कारण माझे पंख वाऱ्याचे नाहीत
ते एका विझलेल्या निखाऱ्याचे
जरी झाडझुडप उलथवुन टाकणारं वादळ आलं तरी
हे पंख फडफडणारे नाहीत
मुळात ते जन्मालाच एका मृत्युच्या भीषण शापाने आले आहेत
तशा साऱ्याच जन्माच्या कहाण्या होतात अस नाही
पण माझ्या जन्माची झाली !
किमान आता जगण्याच गाण व्हाव वाटतं
पण माझं आभाळ एका सरोवरापुरतं मर्यादीत
एका बाजुला सागराची असावी अशी आकाशनिळाई
अन दुसरीकडे श्रावणाची हिरवाई ! गच्च दाट झाडीची
इथे सूर्य माध्यान्ही आल्यावरच होतो सूर्यास्त !
कारण त्याला वितळवणारं पश्चिम क्षितीज
त्याचं नसून वनाच्या काळ्याविभोर उंचपुऱ्या
वाढलेल्या गवतांच्या वातीचं आहे
अन या दोन ऐल पैल तीरांमध्ये
लहरणारं माझं आकाश पण !
इथे सुर्योदय होतो तो एका प्रदीप्त
यज्ञकुंडातुन आलेल्या अग्नीसारखा !
त्याला अर्ध्य देण्यासाठी इथं रोज एक जोगी येतो
सुर्यही अधांतर सरोवरापुढे थांबतो
सुर्यापेक्षाही प्रखर तेज त्या जोगीचं मला पाहवत नाही
या तपस्वीच्या धगधगत्या तेजात एका सतीने उडी घेतली
असा पर्णकुटीपुढचा अश्वतरु आणि पांढरा घोडा
त्याच्या पायातली क्षात्रधर्म पाळणारी नालही सांगते
एक इतिहास !
अन माझ्या जन्माची कहाणी !!



सूर्यास्त .. माध्यान्हीचा

## दोन

ती आली  एका भल्या पहाटे
पायातले सोन्याचे पैंजण वाजवीत
त्याचे घुंगुरवाळे चाळे
लेकुरवाळ्या सोनेरी दवबिंदूंना बिलगलेले
त्याचा आवाजही तसाच !

ती आली टांग्याचे उडवीत धुमारे
चाबकाचे फवारे घोड्याच्या पाठीवर उडवून
उंची वस्त्र-शालू नेसून
देवदारही ठेंगणा होऊन तिच्यापुढे नमला !

तिचे बावनखणी लावण्य पाहून
जागून उठले निद्रिस्त अरण्य तिच्या सौंदर्यप्रवाहाने
ती !.. एक क्षत्रीय राजकन्या !!

गेली नजर एका वारुळावर
तिच्या पापणीच्या लवत्या ललकाराने
वारूळ उध्वस्त !

आडमार्गाचे साप
सापाच्या वेली
वेलीवरचं तेजपुंज फुल
सर्पाच्या विळख्यात ध्यानस्थ योगी !



दवबिन्दु .. सोनेरी

साहित्य प्रतिष्ठान®

सौंदर्यालाही भूल पाडणारं
करुणामय तारुण्याचं तेज
रुद्राक्षाच्या माळेनं वरलेलं अन
तेजाची अविरत उन्हं
संन्यासी सावलीनं निमलेलं !

तिची भूक गेली तहान गेली
वसंतात त्याच्या  दूरस्थ सहवासानें आनंदी असणारी ती
वर्षा ऋतूत ओढीच्या आसवानं भिजली
अन शिशिरपानझडीत विरहात
काट्यात मोगरा मलूल व्हावा तशी अबोल झाली

आता काटाही अबोल झाला
हिऱ्याच्या आदीतम सौंदर्याला सोन्याचं बंधन  पाहीजेच होतं
आणि ती रत्नजडीत अंगठी
पुन्हा एका विश्वामित्र मेनकेच्या इतिहासाचं प्रतिक

त्याचे झुकलेले डोळे तसेच
निमुळते वाकलेल्या कदंबवृक्षाच्या फांदीसारखे !
तिचे गौरतनुय तसेच झुकलेले
थरथरत्या ओठांवरचे
वीजकंपनाच्या रेघांवरचे
काजळकडांच्या मातीवरचे !

अन एक दिवस उत्तर धृवावर
धुक्याची हिमवर्षावाची फुलं घेऊन येणारी पहाट झाली
त्यानं डोळे उघडले
तत्क्षणी त्याच्या पायावर एक हिमफुल पडलं !!



तेज.. करुणामयी



शरण..

तिनं तिचं मस्तक त्याच्या पायावर ठेवलं
सौंदर्य तेजालाश अखेर शरण गेलं होतं
हाय रामा हाय रामा
पण ती खोटं बोलली
म्हणाली
मी तापसी वनवासी
जोगीण म्हणा व दासी
द्या निजसेवा चरणाशी

आपल्या द्यावा खडावा
पुजेन मी  हृदयी ठेवा

तिच्या असत्य बोलण्याने
संध्याकाळ पालथी पडली
कळशीभर पाणी आलं उंबऱ्यात रानाच्या
मांजर झाड सोडून पळालं
वडाच्या पिंजारलेल्या पारंब्यात चित्कारणारं हसू
झाडाची ढोली सुनी सुनी
घुबडाचं अवसान गेलं
एका चिरंतन सत्याची जाणीव देण्याकरता !

पण सौंदर्याला तेजाची भूल पडली
तसा तेजाच्या अस्ताव्यस्त पोकळीत राहणारा एक किरण
अंधाराचंही लावण्य मागणारा होता बहुधा !!

## तीन

पर्णकुटीचे वैराग्यवैभव ती भोगत होती
नंगी तलवार उचलून डोंगर कापून त्यात दरी करणारया
राजाची राजकन्या
त्याच पायथ्याशी एका तेजतत्वात लीन होत होती

तलवारीला म्यान असते ती
तलवारीचं संरक्षण व्हावं म्हणुन नाही
तर दुसऱ्यास इजा नको म्हणून !
पण आता ती तलवारच जखमी घायाळ होती
म्यानावरची निश्चल अचल नक्षी पाहून
त्याची स्तब्धता पाहून
तलवार उदास होती
स्वत:च्या वेगवान खडग पात्यावर असलेला
तिचा जीवच जडला म्यानेवर !

राजकन्या अंगणात  पडलेली
प्राजक्ताची फुलं आणिअश्वथाची पानं
दोन्ही एकदम लोटायची
एका कोपरयात पाचोळा !

गंध निर्माल्याचा
आणि रंग वैफल्याचा
बिचारीला कळत नव्हतं
त्या दोन्हीचं धरणीवरचं
चिरंजीवतेचं वरदान

अबोलीच्या वाळलेल्या बियांवर
पाण्याचे गौंदण आखत बसायची
वाळलेल्या बिया चटचट आवाज करायच्या
दचकुन जायची

दुर वठलेल एक झाड दिसायच



वैभव.. वैराग्याचं

पण हातातली पैंजणाची मोगरीची वीण
अनोखंच काही दरवळायची
त्या फुलांना शोध होता एका दगडाचा
जोगीच्या खडावांचा
ती फुलं निर्विकार होऊन निजून जायची
पर्णकुटीत धुळीत पसरलेल चांदण अन
आभाळात उडालेली चांदण्याची धुळ
अखेर एका मातीची होत असे
तशीच राजकन्या पण एक खडांवावर वाहिलेल फुल होऊन गेली

सहवासाचं पाणी वाहत राहीलं
अन एके दिवशी दर्या उफाळला
अमावस्येचा चंद्र कठोर झाला तरीही उफाळला
तेजाच्या पाषाण समाधीला चिरा गेला अन
मोहकतेला प्राज्ञ खडक व्हावं वाटलं
रुद्राक्षाच्या माळेत मोत्याचे दाणे गुंफले गेले
सर्पिणीच्या वेणीच्या विळख्यात
अस्थीदंश नसणारं एक देहाचं खोड होतं
परकाया प्रवेश !!

अग्नीच्या तेजात सौंदर्याचा
सौंदर्याच्या जळात तेजाचा
अन अखेर
एका निर्जन बेटावर अग्नी भस्म
अन्यथा धरणीला पालथा घालणारा प्रलय
पण असं काहीच घडलं नाही !!



चिरा.. समाधीवर

साहित्य प्रतिष्ठान®

# चार

तिचा सीतेचा अरण्यवास संपला
कुंतीचा अज्ञातवास सुरु झाला
आणि माझा गर्भवास !
नऊ महिने नऊ दिवस उलटुन गेले
समाधानाचे वाळवण एका अस्तनील निखारयात
तिनं टाकून दिलं
आणि मला जन्म दिला
मुक्त झाली ती माझ्या शापित आयुष्यापासून !

पुन्हा वनाकडे जाणाऱया
काट्यांच्या भगव्या वाटा
ती तुडवत होती
तिच्या वक्षाशी मला कवटाळून
मायेचं अभय देत होती
तरीही तिचा एक अज्ञात हुंकार
भितीची जाणीव कुठेतरी खोल ह्रुदयात
मला करून देत होता

संध्येची अधीर लाली पिणारं नग्न अवकाश
अखेर सावल्यांच्या ओझ्यांनी जांभळं व्हावं
तसा मी झालो होतो

ती जोग्याच्या पुढ्यात उभी
त्याला जे समजायचं ते समजलच होत
तिच्या हातातलं तान्हं बाळ
तिची दुर्बलता झाली होती
जोग्याची शीर तडकली
तो फक्त इतकंच बोलला
"तू फसवलंस मला "
आणि कोणतीतरी शापवाणी
उच्चारण्यासाठी
मंतरलेलं पाणी तिच्यावर शिंपडणार
त्याआधीच ती विजेसारखी कोसळली
आणि तिचा श्वास थांबला !



अज्ञात.. हुंकार



आयुष्य.. शापित

ते पाणी माझ्यावर शिंपडून
तो बैरागी निघुन गेला
तेच शापित आयुष्य माझी सोबत झालं !

असं इथल्या प्रत्येक पानाचा झोका अन वारयाची झुळुक
मला अस्पृश्य मानणारया वेली अन
झाडाच्या वेण्यातील फांद्या सांगतात

इथे अजुनही तोच इतिहास घडत राहतो
ऐलतीरावर सापांना ठेचुन खाणाऱ्या
मोराचं सौंदर्य विषानं माखलेलं
आणि पैलतीरावर हरीणीचं भक्ष्य खाणारया
वाघाचं तेज संन्यस्थ, तरीही शापित असलेलं
अन यामध्येच माझं सरोवर आणि मी
दुःख सुर्याला होतं
वेदना कुंती सोसते
पण उपेक्षा नेहमी कर्णाची

## पाच

अजूनही तो जोगी त्याचं सकाळच्या उन्हानं
रक्ताळलेलं शरीर घेऊन येतो
सूर्याला अर्घ्य देतो !

कुणी म्हणतं राजकन्या मेल्यावर
त्यानं तिला जाळलं
तिची राख अंगाला फासुन घेतो
तिच्या आठवणीनं रडतो
जटा आपटतो किंचाळतो
रुद्राक्षाच्या माळा तोडतो
खडावा फोडतो
तिला दोष देतो कधी तिला हाका मारतो !

संध्याकाळच्या एका कपारीत
मग काळोखाप्रमाणे नंगा होऊन जातो !

मला त्याचं ते आध्यात्मिक तेज पहावत नाही
तिच्या टाकलेल्या आणि भोगलेल्या सर्वस्वासाठी
त्यानं पेटवलेलं अग्नीकुंड त्याच्या झळा
मी सोसु शकत नाही
त्याची फक्त आणि फक्त भिती वाटते मला
ज्या अर्थी भिती जिवंत आहे
त्या अर्थी वेदनेचा जन्म माझ्यात झाला नाही
मी जे भोगतो आहे तो केवळ शाप आहे



भिती.. जिवंत

किंवा शापाचा भास आहे
माझ्या वेदनांचं संचित अजून ठरणं बाकी आहे
अन ते उधळण्यासाठी काही अनाम संकेतांवर
मला जगावं लागणार आहे !

पण माझं पांगळंपण मला सांगत आहे
कदाचित अजूनही सटवाई माझं नशीब
लिहण्यासाठी गोंदण घेऊन बसली आहे
माझ्या बंद बाळमुठी अजुन उघडल्या नाही
मी पांगळा नाही मी तान्हा आहे !

केवळ केवळ
आकाशाला कोणतंच छत नाही
म्हणून माझ्या या पोरकेपणावर
मी कधी रडत नाही
त्याच्या उदरीदेखील चांदण्याचं
फाटकं वाकळ अन
त्याच चांदण्याची पतझड !

माझ्या सरोवरात
मी खरंच काय केलं असेल
तर 'तिला' माझ्या नसलेल्या आईला माफ केलं आहे
मला सोडून गेल्याबद्दल !

वास्तविक मला त्या जोगीबद्दल अन राजकन्येबद्दल
दोघांबद्दल प्रेमही नाही तसा तिरस्कारही नाही
पण जोगीच्या भितीचं सावलीचं सावट जसं माझ्या मनावर आहे
त्याहुनही दाट अंधाराचं मऊ पांघरुण घाललेलं
राजकन्येच्या मायेचं अभय मनात आहे !

सरोवरापुढे....
हत्तीणीनं तिच्या पिल्लाच्या सोंडेत केलेली निरगाठ दिसते आहे अन
नाळ वार जमिनीत पुरुन
मला दूध पाजणारी माझी आई आठवते आहे
एक दिवसाचा मी अन वैराण आयुष्य भोगुन
व्यर्थ बलिदान देणारी ती
"माझी आई" !!



अभय

सहा

शापित असलो तर एका भणंग जोगीचा पुत्र होतो
अन रुपवती राजकन्येचा बाळ होतो
तरीही सौंदर्य, तेज या शालीन कुळांत मी जगत नाही
त्या दोघांचा कोणताच वारसा मी चालवत नाही
मी आहे तरी कोण ?
मोराचं मखमली सुंदर मोरपीस दिसतं
चिमणीचं घरटं, त्याची वीण दिसते
या साऱ्या जादूभऱ्या स्वप्नात
मला दिसतं ते माझं अनोळखीपण !

रडू तरी कसा मी माझ्या अनोळखीपणावर ?
संध्याकाळचे दुखाचे पश्चिम दिवेच इथे दिसत नाहीत
इथं आहे ते काळोखाचं द्वार बंद वर्षानुवर्ष
एखाद वीजेचं पाखरु
झाडावर बसतं तसं
माझ्यावर कोसळून का नाही पडत
कसं भोगू अनाथाचं दुःख ?

वड त्याच्या जाडजूड पारंब्या
सोडून माझी समजुत काढतो आहे
औदंबर त्याची पानं माझ्यावर टाकून
मला कुरवाळतो आहे .....
तरीही मी एकटाच आहे
माझ्या अस्तित्वाच्या व्यथेने
कदाचित माझी आई सोबत
असती तर माझ्या या
अस्तित्वहीन प्रवासात मी तसाही
आनंदी राहिलो असतो
कारण सोबत आई असती

मायेच्या पंखाला मग कोणत्याच
आभाळाची ओळख लागलीच नसती
इथला मी कोण ?



मी.. कोण?

कुरुपता हेच माझ सौंदर्य
आणि मौन हेच माझं सर्वस्व
तरीही त्या कोकीळेचं स्वरचुंबन
मी भिजल्या अश्रूंनी स्वीकारलं आहे
मलाही गायचं आहे
मलाही उडायचं आहे
पण आई, तू का गेलीस सोडून ?

काजव्यांचे तुरे घेऊन आलेली वटवाघळं भिती दाखवतात
ती फक्त मलाच दाखवतात
कारण मी कुणीच नाही
मी देखील त्या वटवाघळा इतकाच कुरूप आहे
माझे काळे पंख काळं शरीर
पण मी तसा नाही त्याच्यासारखा
मग मी कोण आहे ?
इथे सगळे ईश्वराच्या चमत्काराचे कलाकार आहेत
कोकीळ हरीण हत्ती मोर लांडोर
वाघ गरुड सिंह सारे सारेच
मग मी का नाही ?
इथं उत्तर देणारंही कुणी नाही
पुन्हा वाट पाहतो आहे एका सुर्योदयाची
जोगीच्या दर्शनाची
त्याच्या तापलेल्या तेजात
असावी एखादी तरी हृदयाची सावली
पण हा काळोख, अनोळखी रात्र
मला रडावसं वाटतं आहे
कुणाच्या कुशीत रडू मी ?

पंखानीच आसवं पुसतो आहे मी
आणिक तो ढगाआडचा चंद्र४..



कुरूपता.. सौंदर्य

# सात

रात्री अकल्पांतिक दु:खानं मारलेली मगरमिठी सुटली
आणि सूर्योदय झाला
बंदिस्त कमळात गंध पोखरणारा भुंगा मुक्त झाला..
अन कमळ सूर्यापुढं नतमस्तक झालं
भितीच्या पालखीनं सजलेल्या माझ्या मनातल्या सावल्या
पाण्याच्या रंगाच्या दिसायला लागल्या
आणि मी जोगीच्या दर्शनाची वाट पाहु लागलो
त्याच्या अर्ध्यातुन आज ओंजळीतून सूर्य प्यायचा
असं मनाशी ठरवून बसलो
जोगी आलाच नाही !

मी परस्पापरांमध्ये मिठी घालुन बसलेल्या
दोन आंब्याच्या झाडाच्या आडोश्यातून बाहेर आलो
पर्णकुटीकडे, जोगीकडे पाहु लागलो
मी पहाता क्षणी आत फक्त इतकंच दिसलं
जोगीच्या एका खाद्यांवर गरुड होता अन एका खांद्यावर घार
तत्क्षणी जोगी लुप्त झाला !

त्याचं हे अदृश्य होण मला नवीन नव्हत
तो अधेमधे गायब व्हायचा अन वसंत यायचा त्याच्या माघारी
जणू त्याचं आणि वसंतातल्या फुलांचं नातं
कधीच तुटलेलं आहे
या आवेशात तो निघून जायचा !

काल ज्या एकटेपणावर रडत होतो
तेच आज अधिक प्रिय वाटु लागल
का कोण जाणे कोणती अनामिक हुरहुरीची चाहुल घेऊन वसंत आला होता
दुपार तिच्या कातर हळव्या उन्हानं
हळद लावलेल्या नव्या नवरीसारखी चढत होती
हिरव्या बहराच्या प्रत्येक रंध्रात एकेक सावली शोधुन
वारा तिथं वस्ती करत होता
दुपार टळली



सूर्योदय..

साहित्य प्रतिष्ठान®




शाप..?

आता संध्याकाळ हळुहळु कूस बदलू लागली
मला उगाचच वाटल जोगीच्या कुटीत
सांजवातीचा एखादा दिवा तेवत आहे
तसं एक तांबडं हरीण कुटीतून बाहेर आलं
अन सरोवरात येऊन पाणी पिऊन गेलं
त्याच्या गळ्यातला गुंफलेला चाफ्याचा हार पाण्यात पडला
मी अगदी मोहरुन गेलो
तो हार उचलुन मी त्याचा थंडगार स्पर्श अनुभवला
क्षितीज शिंपल्यातून चांदणमोती उधळणारा चंद्र दिसला
आणि काय गंमत !
ज्या हरिणाचा मी चाफ्याचा हार घेतला होता
त्याचं हरिणाने पैलतीरावरुन शिंपल्या शंखाचा हार फेकला
दोन्ही हार गळ्यात मिरवून
मी सरोवरात बागडू लागलो
एक शंख हृदयावर अगदी ओरखडा काढल्यासारखा
मला चिरत होता आणि चाफा तो ओरखडा,
ती जखम आणखीन सुगंधी बनवत होता !

मी क्षणात थोडाचा चरकलो
चाफा निष्पर्ण झाडावर जसा एकाकी राहतो
तसे शंखशिंपलेही वाळूत वाळवंटात राहतात
अगदी उदास एकाकी संन्यासी होवून
मी पुन्हा तेच बैरागीपण आत्मसात केल की काय
त्या हरीणाने का हार फेकले असावेत
की शाप दिला आहे त्याने मला ?

साहित्य प्रतिष्ठान®

संध्येने मला एका गर्द गूढ रात्रीच्या खाईत फेकलं होतं
मला कोणतं तरी दु:ख पुन्हा साद घालु लागलं
कुणीतरी या चाफ्यासोबत अत्तर पाठवल होतं एका अनाम केशरी वेदनेचं
मर्मभेदी आसवांच्या अचानक येण्यानं
मी देखील थकलो होतो !
हळुहळु या वेदनेनं माझं शरीर ताब्यात घ्यावं आणि
ती जिथे नेईल तिथवर मी जावं अस मी ठरवु लागलो
अन त्या रात्री मी एका वेदनेशी श्रृंगार केला
तितक्याच निर्भीडपणे जणु एका वेश्येच्या मुलीशी केला असता
मग मला वेदना आणि वेश्येची मुलगी
एका रेषेत मला दिसु लागल्या
अगदी एकसारख्या
वेदनेनं हात सोडला आणि
ती रेष एका क्षितीजरेघेवर स्तब्ध झाली
सुर्योदयापुर्वीच !

सरोवर एका लाल रंगानं माखलं होतं
एक मादी बदक तिचे जखमी पंख धूत होती
तिच्या पंखाच्या ओरखडयावरुन नक्की कळालं होतं मला
ती एका कोल्हाच्या झटापटीतून सुटून आली होती

तो शिंपल्याचा ओरखडा, ती चाफ्याची वेदना
मी काल रात्रीच अनुभवली होती
तिने पाण्यात विसळलेल्या रक्तानं मी विव्हळलो होतो
मी तिच्याकडे पाहणार इतक्यात
तिने माझ्याकडे नजर वळवली४..



वळलेली नजर..

राजहंसाची ही कथा इथे संपत नाही
अनेक कंगोरे अजून समोर यायचे आहेत
काही धुमारे फुटायचे आहेत..
राजहंस एकला.. लवकरच दुसऱ्या भागात
आपली कथा पुढे नेईल..

हा दुसरा भाग आणि त्यानंतरचेही भाग मिळण्यासाठी आम्हाला कळवा

अधिक माहितीसाठी लिहा:
esahity@gmail.com

वेबसाईट:
http://www.esahity.com/

धन्यवाद

ई साहित्य प्रतिष्ठान®

ऋणनिर्देश

राजहंस एकला साकार होत आहे. पहिलं पुस्तक अन त्यात ते थेट इंटरनेटवर म्हणजे ईबुक! हा खरंच एक मोठा क्षण आहे.
राजहंस एकला साठी ची श्रेयनामावली खूप मोठी आहे, अर्थातच प्रत्येक प्रयत्नाची ती तशी असते. हे प्रयत्न मूर्तरूपात साकार होत आहेत ते संहिताच्या प्रेरणेमुळे, रंजन काकूच्या अतुल्य साथीमुळे आणि नामकाका, ई-साहित्य प्रतिष्ठान यांच्या पूर्ण पाठिंब्यामुळ ! त्यामुळे तसं हे पुस्तक माझं नसून आम्हा सर्वांचं बनलं आहे.

ई-साहित्य प्रतिष्ठान च्या साहित्यसेवेमधे माझा हातभार लागतो आहे हेही नसे थोडके. त्यांच्यामुळे आज माझे शब्द जवळ जवळ सव्वा लाख लोकांपर्यंत जगभर विनामूल्य पोहोचताहेत. हीच माझ्यासाठी खूप मोठी उपलब्धी! या सव्वा लाखांचे लवकरच बारा लाख होवोत आणि त्यांची ही चळवळ साध्य होवो हीच सदिच्छा.

माझ्या सगळ्या मित्र-मैत्रिणींचे मनापासून आभार. तुम्ही सतत देत असलेल्या प्रोत्साहनामुळेच हे लिखाण आणि हा राजहंस शक्य झाले आहेत.

सर्वांचे पुन्हा एकदा धन्यवाद.. वंदन४

कविता मोकाशी

अधिक माहितीसाठी लिहा:
esahity@gmail.com

वेबसाईट:
http://www.esahity.com/

धन्यवाद